MHLA050002462024

**विशेष दरखास्त क्र.५९/२०२४ मधील नि.क्र.१३ वरील आदेश**
**[ मारोती ..वि.. शासन व इतर ]**

सदरकामी जाबदार क्र.१ आणि २ यांनी अर्ज देऊन नमुद केले की, याकामी त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे आणि तो रद्दबातल होऊन मिळावा.

२. अर्जदाराने दिलेल्या आपल्या म्हणण्यात ऋणको यांना सर्व कागदपत्रे दिनांक १३/०६/२०२४ रोजी प्राप्त झाले असुन त्यांनी काम चालण्यास उशीर व्हावा म्हणुन प्रस्तुत अर्ज दिला असल्याचे नमुद केले. त्यामुळे त्यांना दंड व्हावा असे नमुद केले.

३. प्रस्तुतची दरखास्त ही भुसंपादन निर्देशन अर्जामधील निवाडयाच्या वसुलीसाठी आहे. त्यामध्ये जाबदार क्र.१ आणि २ हे शासन प्रतिनिधी आहेत. त्यांना दरखास्तीची समज मिळाल्यानंतर दिनांक ०७/०८/२०२४ रोजी हजर होणे आवश्यक होते. मात्र दिनांक ०४/०१/२०२५ रोजी हजर झाल्यावर त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

४. या अर्जामध्ये उशिरा अर्ज दाखल करण्यासाठी काय कारण घडले याचा उल्लेख नाही. त्यांच्या विरुध्दचा आदेश रद्दबातल का करावा याचा उल्लेख नाही. तो आदेश रद्द न झाल्यास शासनाला काय नुकसान होणार आहे याबद्दल भाष्य नाही.

५. अशा स्वरुपाचा अर्ज दाखल करताना वरील सर्व बाबी नमुद असणे आवश्यक आहे. शासनाने त्यांना एखाद्या प्रकरणामध्ये संधी दिल्यानंतर तिच्याकडे दुर्लक्ष करणे व कालांतराने हजर होऊन गमावलेली संधी पुन्हा मिळवण्यासाठी अर्ज देणे हा कालापव्यय करण्याचा प्रकार आहे.

६. त्यामुळे या प्रकरणात जाबदार क्र.१ आणि २ यांनी कोणत्याही स्वरुपात कालापव्यय न करण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य आहे.

७. शासनास दंड लावावा असे अर्जदारातर्फे सांगण्यात आले. मात्र शासनास दंड लावल्यास तो सर्वसामान्य नागरीकांच्या खिशातुन जाईल. त्यामुळे शासनास दंड न आकारता वर नमुद अटीवर अर्ज मंजुर करण्यात येतो.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक: १७/०२/२०२५.**

**[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.